REGISTERED No. B. 3434

डोंगरे यांच्या बालामृताने अशक्त मुले सशक्त होतात

# अर्थ

" अर्थ एव प्रधानः " इति कौटिल्यः अर्थमूलौ धर्मकामाविति । —कौटिलीय अर्थशास्त्र

वर्ष १४ पुणें, बुधवार तारीख १८ ऑगस्ट, १९४८ अंक ३३


दी

## बँक ऑफ कोल्हापूर, लि.

एच. एच. दी छत्रपति महाराजा ऑफ कोल्हापूर ह्यांचे सरकारचे आश्रयाखालील व त्याचा फार मोठा पाठिंबा मिळत असलेली.

[ *कोल्हापूर येथें नोंदलेली व भागीदारांची जबाबदारी मर्यादित असलेली.* ]

**स्थापनाः १९२६**

मुख्य कचेरी :

**सर बर्डवुड रोड, लक्ष्मीपुरी, कोल्हापूर.**

तार : BANKOP फोन : २८९

| | |
|---|---|
| आधिकृत भांडवल | ४०,०६,५०० रु. |
| विक्रीस काढलेलें व खपलेलें | २०,२६,००० रु. |
| वसूल | १०,१३,००० रु. |
| रिझर्व्ह फंड | ७,८६,००० रु. |
| खेळतें भांडवल | २,८८,००,००० रु. हून अधिक |

**शाखा :**

(१) गुजरी (२) शाहुपुरी–कोल्हापूर (३) मलकापूर (४) पेठ वडगांव (५) जयसिंगपूर (६) इचलकरंजी (७) गडहिंग्लज (८) निपाणी (जि. बेळगांव) (९) मुंबई (१०) मांडवी–मुंबई.

—बँकिंगचे सर्व प्रकारचे व्यवहार केले जातात—

मुख्य कचेरींतील रूफ डिपॉझिट लॉकर्सच्या उत्तम व्यवस्थेचा फायदा घ्या.

व्ही. ए. सावंत, जनरल मॅनेजर.



## दी भारत इंडस्ट्रिअल बँक, लि०

**हेड ऑफिसः—पुणें शहर**

शाखाः—(१) पुणें लष्कर (२) बारामती (३) लोणावळा (४) श्रीरामपूर ( बेलापूर रोड ) (५) ओझर ( जि. नाशिक )

पे ऑफिस–खोपोली ( जि. कुलाबा )

चेअरमन— श्री. के. वि. केळकर, एम्. ए. एलएल. बी., वकील

**ठेवी**—चालूं खातीं पाव टक्का, सेव्हिंग्ज् दीड टक्का, सेव्हिंग्ज् ( स्त्री खातेदार ) २ टक्के. कायमठेवी मुदत महिने ६ ते ५ वर्षे : व्याज २॥। टक्के ते ४। टक्के पर्यंत.

सेव्हिंग्ज् खात्यांतील रकमा चेकनें काढतां येतात. शॉर्ट टर्म डिपॉझिट्स स्वीकारली जातात. बँकेच्या मुख्य कचेरींत स्त्री खातेदारांसाठीं स्वतंत्र खिडकीची व्यवस्था.

**सर्व प्रकारचे बँकिंगचे व्यवहार केले जातात.**

रा. बा. साळवेकर बी. ए. एलएल. बी.
नी. ना. क्षीरसागर.
मॅनेजिंग डायरेक्टर्स



## दि प्रेसिडेन्सी इंडस्ट्रियल बँक लि.

**प्रेसिडेन्सी बँक बिल्डिंग**

पुणें २.

| | |
|---|---|
| अधिकृत, विक्रीस काढलेलें व खपलेलें भांडवल | रु. १०,००,००० |
| जमा झालेलें भांडवल | रु. ७,११,८९० |
| खेळतें भांडवल | रु. ६६,५०,००० |

मुंबई शाखाः—इस्माईल बिल्डिंग, हॉर्नबी रोड, मुंबई १

श्री. ग. रा. साठे, अध्यक्ष. श्री. दा. ग. बापट, उपाध्यक्ष.

**बँकिंगचे सर्व व्यवहार केले जातात.**

**" बँक शिड्यूल्ड बँक झाली आहे. "**

श्री. गो. धों. जोगळेकर बी. ए. (ऑ.), बी. कॉम., एलएल. बी., मॅनेजर

श्री. सी. टी. चितळे मॅनेजिंग डायरेक्टर

# आगाऊ तरतूद करा

आपल्या शेतीवरील पुढें होणारी पाणीपुरवठ्याची अडचण दूर करण्यासाठीं आतांच पंप व एंजिन्सची ऑर्डर द्या.

— चौकशी करा —

केळकर बंधु, बुधवार चौक पुणें २.


## विविध माहिती

**स्थावरावरील कर**—हिंदी लोकसभेच्या चालू अधिवेशनांत स्थावरावरील करासंबंधीं जें बिल मांडण्यांत येणार आहे, त्याबद्दल मुंबईत बरीच चर्चा चालू आहे असें समजतें. ह्या कराऐवजीं वारसा कर बसविणारें एक बिल मांडलें जाईल, असें व्यापारी म्हणतात. स्थावरावरील करापेक्षा वारसा कर देशांतील वारसा ठरविण्याच्या पद्धतीशीं अधिक सुसंगत आहे, असें व्यापारीवर्गाचें म्हणणें आहे. वारसा कराप्रमाणें अविभक्त हिंदु कुटुंबांतील प्रत्येक सहभागी माणसाच्या मालमत्तेवर कर बसवितां येईल. ह्याच्या उलट, स्थावरावरील बिलांत सबंध कुटुंबाच्या मालमत्तेवर कर घेण्यांत येईल. हिंदचे फडणीस ह्यांनीं स्थावर कराच्या बिलांत दुरुस्त्या सुचविल्या गेल्या तर सरकार त्यांचा विचार करील असें सांगितलें होतें; परंतु असें करून सुद्धां स्थावरावरील कराचा हेतू साध्य होईल कीं नाहीं ह्याची शंकाच आहे. तेव्हां सरकारनें तें बिल मागें घेऊन वारसा बिल मांडावें असा सूर ऐकूं येत आहे.

**भांडवलाची उभारणी**—भांडवलाच्या नवीन उभारणीवर नियंत्रण ठेवण्याची पद्धत कशी असावी, आणि उभारणीच्या अर्जाबद्दल सर्वसामान्य धोरण काय असावें, ह्याविषयीं सल्ला देण्याकरितां हिंद सरकारनें एक सल्लागार समिति स्थापन करण्याचें ठरविलें आहे. समितीची पहिली सभा सप्टेंबरच्या पहिल्या आठवड्यांत भरणार आहे. कमिटीचे सभासद पुढीलप्रमाणें रहातील:—हिंदी लोकसभेचे दोन प्रतिनिधी, एक फडणिशी खात्याचा प्रतिनिधी, असोसिएटेड चेंबर्स ऑफ कॉमर्स आणि फेडरेशन ऑफ इंडिअन चेंबर्स ऑफ कॉमर्स ह्यांचा एक प्रतिनिधी. भांडवल नियंत्रणाचा मुख्याधिकारी समितीचा चिटणीस म्हणून काम करणार आहे.

**शेतीविषयक हिंदी मासिक**—इंडिअन कौन्सिल ऑफ ॲग्रिकल्चरल् रिसर्च ह्या संस्थेतर्फे शेतकी व गुरांची जोपासना ह्या विषयांवरचे शोध सुशिक्षित शेतकऱ्यांना 'इंडिअन फार्मिंग' ह्या इंग्रजी मासिकाच्या द्वारें माहीत करून देण्यांत येत असतात. अशा माहितीस अधिक मागणी असल्याचें आढळून आल्यावरून 'खेती' हें हिंदी मासिकहि आतां प्रकाशित करण्यांत येणार आहे. गुरांची जोपासना व वाढ, कोंबड्यांचा धंदा, घरची बागाईत इत्यादी विषयांवर पहिल्या अंकांत लेख आलेले आहेत.

### दि बेळगांव बँक लि, बेळगांव

(वार्षिक सभा : २१-९-४८)

वरील बँकेचा ३० जून, १९४८ अखेरचा रिपोर्ट आमचेकडे आला आहे. बँकेचें खेळतें भांडवल गेल्या वर्षी ५४ लक्ष, ६१ हजार रु. होतें तें आतां ६५ लक्ष, ६१ हजार रुपयांवर गेलें आहे. निवळ नफाहि ३१ हजार रुपयांवरून ४७½ हजारांवर गेला आहे. नोकरवर्गास ८,५०० रु. बोनसची आगाऊ तरतूद करून हा नफा दिसत आहे. नफ्यांतून ६¼% करमाफ डिव्हिडंड देण्याकडे ३०,८९६ रुपयांचा विनियोग करावा व ११,००० रु. रिझर्व्ह फंडांत टाकावे अशी डायरेक्टरांची शिफारस आहे. बँकेचें वसूल भांडवल ५ लक्ष रुपये असून तिचे रिझर्व्ह व इतर फंड ९८,०९१ रुपयांचे आहेत. त्यांत आतां ११ हजारांची भर पडणार आहे. बँकेकडे ५२½ लक्ष रुपयांच्या ठेवी आहेत. बँकेनें सुमारें १७ लक्ष रुपये रोख व बँकांत ठेवून १५½ लक्ष रुपये मुख्यतः सरकारी रोख्यांत गुंतवले आहेत आणि ३१½ लक्ष रुपयांचीं कर्जें दिलीं आहेत. बँकेला कमिशनच्या रूपानें सुमारें ५९ हजार रुपये मिळाले, ह्यावरून तिच्या किफायतशीर व्यवहाराची कल्पना येईल. अहवालाचे वर्षी बँकेनें देवगड, सावंतवाडी व व अनगोळ येथें शाखा उघडून आपलें व्यवहारक्षेत्र वाढविलें. आतां बँकेच्या २९ ठिकाणीं शाखा चालू आहेत. गेल्या वर्षाच्या प्रतिकूल परिस्थितींतहि बँकेनें चांगली प्रगति केली आहे. बँकेच्या ताळेबंदाबरोबरील प्रगतीचा तुलनात्मक तक्ता, गेल्या सहा वर्षांतील बँकेची सतत होत असलेली प्रगति स्पष्ट दाखवितो. (चेअरमनः श्री. एम. जी. हेरेकर; मॅनेजिंग डायरेक्टरः श्री. ए. आर नाईक, बी. ए., बी. एससी., एलएल. बी.)

---

### चुकीच्या विधानाची दुरुस्ती

"अर्था" च्या ता ११ च्या अंकांत ९ कोट शिलकीसंबंधी लावलेला अर्थ सर स्टॅफर्ड क्रिप्स ह्यांच्या पत्राला धरून नाहीं, ही गोष्ट आमच्या एका अभ्यासू मित्रानें आमच्या नजरेस पत्रद्वारें आणून दिली आहे. त्याबद्दल आम्हीं त्यांचे आभारी आहों.

संपादक

---


### धी बार्शी सेंट्रल को-ऑ. बँक लि.

## नोटीस

बँकेच्या सर्व सभासदांस कळविण्यांत येतें कीं बँकेची सर्वसाधारण सभा रविवार दिनांक ५ सप्टेंबर १९४८ इ. दिवशीं दुपारीं ३ वाजतां बार्शी येथें बँकेच्या साने-मेमोरियल हॉलमध्यें बँकेच्या नोटीस बोर्डावर प्रसिद्ध केलेल्या विषयांचा विचार करण्याकरितां भरणार आहे. तरी सदरहू सभेचे वेळीं सर्व सभासदांनीं उपस्थित राहण्याची कृपा करावी.

बोर्डाचे हुकुमावरून

बार्शी, दिनांक १८-७-४८ — र. प. पटवर्धन, मॅनेजर

तयार कपड्यांचे व्यापारी **महिंद्रकर ब्रदर्स** गिरगांव, मुंबई नं. ४ व बुधवार चौक, पुणें

-सर्व प्रांतांतील- सुती - गरम - रेशमी —खादीचें माहेरघर— **खादी मन्दिर** २६२, बुधवार पेठ, ढमढेरे बोळाजवळ, पुणें २

# अर्थ

बुधवार, ता. १८ ऑगस्ट १९४८





प्रो. वा. गो. काळे


संपादक :

श्रीपाद वामन काळे

वा. वर्गणी ट. ख. सह ६ रु. किरकोळ अं. २ आणे.


## स्टर्लिंग शिलकीचा परतफेडीचा करार

### अर्थमंत्र्यांनीं केलेलें समर्थन

हिंदी पार्लमेंटानें गेल्या आठवड्यांत अर्थमंत्र्यांच्या दोन पुरवणी मागण्यांस मंजुरी दिली. त्यांपैकीं एक मागणी २,१६,२७,१८,००० रुपयांची होती व त्या रकमेचा विनियोग सेवानिवृत्त इंग्रज अधिकाऱ्यांच्या, पुढें देत रहाव्या लागणाऱ्या पेन्शनांचें वर्षासन विकत घेण्यासाठी आहे. ह्या मागणीची पार्श्वभूमि वर्णन करतांना अर्थमंत्री श्री. चेट्टी म्हणाले, कीं ह्या संबंधांतील पाकिस्तानच्या जबाबदारीचाहि वांटा हिंद सरकारनें फाळणीच्या करारान्वयें उचललेला आहे. ह्या पेन्शनांच्या रकमेची भरपाई हिंद सरकारला दरसाल करावी लागली असती. परंतु, हिंद व पाकिस्तान ह्यांचेमध्यें स्टर्लिंग कर्जाची वांटणी करण्यापूर्वींच, अविभक्त कर्जाच्या रकमेंतून आम्हीं हें देणें भागविण्याची व्यवस्था करीत आहोंत. म्हणजे, पुढें इंग्लंडमध्यें पेन्शनें पोंचविण्याची व त्यांची रक्कम पाकिस्तानकडून वसूल करण्याची अडचण उरणार नाहीं. हिंद सरकारनें पेन्शनचें देणें एका रकमेनें तोडून टाकून त्यासंबंधांतील आपल्या जबाबदारींतून मुक्त व्हावें, असा ब्रिटिश फडणिसांचा आग्रह होता. पेन्शनच्या रकमेची व्यवस्था केली, तरी ती प्रत्यक्ष देणें ही गोष्ट हिंद सरकारनें जाणूनबुजून स्वतःच्या हातांत ठेवली आहे. कारण, इंग्रज पेन्शनर हिंद–निष्ठ रहातील तरच त्यांस पेन्शन मिळत राहील, असा दंडक आहे. आज ह्या पेन्शनांवर इनकमटॅक्सची माफी आहे; परंतु हिंद सरकारनें कायदा बदलून त्यांवर कर बसविण्याचा अधिकार स्वतःकडे घेतला आहे. सरकारनें ह्या पेन्शनांवर इनकम टॅक्स बसविला, तर ब्रिटिश सरकार पेन्शनरांची गैरसोय वांचविण्यासाठी स्वतः कराच्या रकमेचा आपणाकडे भरणा करील, असें करारांत नमूद केलेलें आहे.

अर्थमंत्र्यांच्या दुसऱ्या मागणीची रक्कम ६५,६३,००,००० रुपये होती व तिचा विनियोग ग्रेटब्रिटनच्या हिंदमधील लष्करी सामुग्रीबद्दलचें देणें भागविण्याकडे केला जाईल. ह्या सामुग्रीची हिशेबांत नोंदलेली किंमत बरीच मोठी होती; परंतु अखेर थोड्या रकमेवर हें देणें मिटविण्यांत आपण यश मिळविलें, ह्याचा श्री. चेट्टी ह्यांनीं समाधानपूर्वक उल्लेख केला. ही रकमहि ग्रेट ब्रिटनकडून येणें असलेल्या हिंद-पाकिस्तानच्या अविभक्त कर्जांतून भागविली जाईल.

स्टर्लिंगची रक्कम हिंदला प्रत्यक्ष कशी उपलब्ध व्हावयाची, हा प्रश्न सर्वांत अवघड व जिव्हाळ्याचा आहे. ग्रेटब्रिटन आपल्याकडून माल आयात न करतां आपणांकडे किती माल पाठवूं शकेल, ह्यावर सर्व कांहीं अवलंबून आहे. ग्रेट ब्रिटन माल देऊं शकला, तरी त्याचा आपण उपयोग करूं शकलों पाहिजे; परंतु गेल्या वर्षांतील अनुभव उत्साहकारक नाहीं. बेल्जम व पोर्तुगाल हे देश वगळले, तर बाकीच्या सबंध युरोपांतून कोठूनहि आपण माल आणण्यास आतां अडचण उरलेली नाहीं. इथपर्यंत सर्व ठीक आहे. परंतु कोणत्याहि चलनामध्यें (मुख्यतः डॉलर) परराष्ट्रांचीं देणीं फेडण्यासाठीं स्टर्लिंगमधील आपल्या येण्याचा मोठ्या प्रमाणावर आपणांस उपयोग करतां येण्याजोगा नाहीं. ह्या महत्त्वाच्या घटनेचें समर्थन करतांना अर्थमंत्र्यांनीं ब्रिटिश फडणिसांच्या अडचणी मान्य केलेल्या दिसतात. हिंदुस्थानाचें पौंडी येणें ब्रिटिश सरकारनें पूर्णपणें मान्य केलें आहे असें आपले अर्थमंत्री छातीठोकपणें सांगत आहेत. परंतु, ह्या प्रश्नासंबंधीं स्पष्ट खुलासा वाटाघाटींत व करारांत करण्यांत आला असता, तर बरें झालें असतें.

## हिंदी स्वातंत्र्याची जोपासना

### दुःस्थितीचीं कारणें व नागरीक

हिंदी स्वातंत्र्यदिनानिमित्त ठिकठिकाणीं वृक्षारोपण समारंभ झाले. झाडें आज लावलीं, तरी त्यांची निगा राखून, त्यांचेवरील बांडगुळें काढून, त्यांची वाढ करावी लागते. फळें कालावधीनेंच मिळतात. ह्या पिढीनें लावलेल्या झाडांचा फायदा पुढच्या पिढीस मिळतो. आंब्याचें झाड पुरें वाढण्यापूर्वींच त्यास थोडा मोहोर आला, तरी तो खुडून टाकतात. हेतु हा, कीं आज फळांची घाई न करतां वाट पाहिली, तर झाड मोठें होऊन तें फळें जास्त देतें.

गेल्या दोन पिढ्यांच्या स्वार्थत्यागामुळें, महात्माजींच्या प्रभावी नेतृत्वाखालीं हिंदुस्थानास स्वातंत्र्यप्राप्ति झाली. स्वातंत्र्य मिळालें कीं आपले सर्व प्रश्न तात्काळ सुटून आपली परिस्थिति सुधारेल ह्या अपेक्षेनें सर्व जण स्वातंत्र्याकडे पहात होते. परंतु, स्वातंत्र्याची ऐहिक बाजू ही त्याची एकच बाजू नाहीं; स्वातंत्र्य हा एक मानसिक ठेवा आहे आणि त्यासाठीं लोक आपलें सर्वस्वहि अर्पण्यास तयार असतात. अशा रीतीनें कमावलेल्या व जोपासना केलेल्या स्वातंत्र्यांतूनच सर्वांगीण उन्नति उगम पावते आणि नागरिकांच्या स्वार्थत्यागाच्या व कार्यक्षमतेच्या प्रमाणांत ती फोफावते. हिंदुस्थानच्या स्वातंत्र्यवृक्षाच्या वाढीस यत्किंचितहि हातभार न लावतां, आपण त्याचीं फळें चाखण्यास मिळत नाहींत म्हणून अधीर झालों, तर तें समर्थनीय होणार नाहीं.

हिंदुस्थान सरकारनें गेल्या बारा महिन्यांत अत्यंत धीरानें राज्यकारभार हांकून व कायद्याबद्दल जास्त आदर निर्माण करून पुढील प्रगतीचा पाया घातला आहे. जनतेच्या अपेक्षा पुऱ्या झाल्या नसतील, तर त्यास सरकारप्रमाणें जनताहि जबाबदार आहे. आर्थिक बाबतींत सुधारणा घडवून आणण्याचें, महागाईस आळा घालण्याचें व उत्पादन वाढवून लोकांच्या रहाणीचें मान सुधारण्याचें काम अद्याप पार पडावयाचें आहे. स्वातंत्र्यदिनाचे निमित्तानें, हिंदी नागरिकांना ह्या संबंधांतील त्यांची जबाबदारी पटवून देण्याचा प्रयत्न विचारवंत पुढाऱ्यांनीं केला आहे. सरकारपुढील प्रश्न सोडविण्याचे कामीं सामान्य जनतेनें, आपल्या सक्रिय कामगिरीनें सहाय केलें पाहिजे. प्रत्येकानें आपलें कर्तव्य देशहितास स्मरून कार्यक्षमतेनें व संघटितपणें पार पाडलें तर उत्पादनवाढीचे व इतरहि सर्व प्रश्न सत्वर सुटूं शकतील. जनतेचा तात्कालिक स्वार्थाचा मोह हेंच आपल्या देशाच्या दुःस्थितीचें मोठें कारण आहे आणि तें दूर करण्यासाठीं प्रयत्नांची शिकस्त केली पाहिजे.

मुंबई हायकोर्टाचा निवाडा

## कंपनी ताब्यांत घेण्यासाठी स्पर्धा

### नवे शेअर्स मिळविण्याचा अधिकार कोणाचा ?

जुलै १९४४ पासून सर पद्मपाद सिंघानिया ह्यांनीं बाँबे लाइफ ॲश्युअरन्स कं. लि. चे मिळतील तेवढे शेअर्स खरेदी करण्यास प्रारंभ केला, त्यामुळें जे शेअर्स २५० रुपयांस मिळावयाचे, ते मार्च १९४५ मध्यें २,००० रुपयांसही दुर्मिळ झाले ! गुप्ता नांवाचा एजंट सर पद्मपाद ह्यांचे वतीनें हें काम करी. त्यानें भाईदास गुलाबदास नांवाच्या एका इसमाकडून ६६७ शेअर्स विकत घेण्याचें मान्य केलें. गुलाबदास हा पिंगळे वेंकटराम रेड्डी ह्यांचा कायदेशीर प्रतिनिधी होता. २९ जुलै, १९४४ रोजीं गुप्तानें शेअर्सचे पैसे देऊन शेअर सर्टिफिकिटें व ट्रॅन्स्फर फॉर्म मिळवले. इकडे सर पद्मपाद आणि त्यांचा पक्ष व कंपनीच्या बोर्डाचे चेअरमन श्री. माणेकलाल प्रेमचंद व त्यांचा पक्ष ह्यांच्यांत कंपनीवर प्रभुत्व मिळविण्यासाठी स्पर्धा चालू होती. २१ फेब्रुवारी, १९४५ रोजीं बोर्डानें ४,५९६ नवे शेअर्स विक्रीस काढण्याचें ठरविलें आणि २० फेब्रुवारी रोजीं भागीदारांच्या पटावर असलेल्यांना ते प्रत्येक जुन्या ५ शेअर्सना ४ नवे शेअर्स ह्या प्रमाणांत देऊं केले.

रेड्डींचें नांव भागीदारांच्या पटावर अद्याप होतेंच; त्यांचे शेअर्स वर्ग झालेले नव्हते. ४२४ नवे शेअर्स घेण्यास रेड्डी पात्र असतांहि त्यांनीं फक्त ४० नवे शेअर्स मागितले.

"रेड्डींनीं स्वतः तरी आणखी ३८४ नवे शेअर्स घ्यावेत, नाहींतर "अ" अर्ज भरून सर पद्मपाद ह्यांचेकडे पाठवावा म्हणजे त्यांना ते घेतां येतील" अशा अर्थाचीं सर्क्युलरपत्रें रेड्डींना आलीं. परंतु रेड्डींनीं तें करण्याचें नाकारलें. रेड्डी हे बाँबे लाइफच्या शेअर्सपुरते माझे केवळ विश्वस्त आहेत; त्यांनीं "अ" अर्ज भरून दिलाच पाहिजे, अशी मागणी करणारा अर्ज सर पद्मपाद ह्यांनीं हायकोर्टाकडे केला.

इकडे कोर्ट रिसीव्हरला रेड्डींच्या शेअर्सचे रिसीव्हर नेमण्यांत आलें. त्यानें रेड्डींच्या तर्फें अर्ज करून कंपनीकडे ३८४ नव्या शेअर्सची मागणी केली, परंतु कंपनीनें ते देण्यास नकार दिला. रेड्डींनीं फक्त ४० च नवे शेअर्स एकदा मागितल्यावर, इतर नव्या शेअर्सची मागणी करण्याचा त्यांस अधिकार उरला नाहीं, असा कंपनीचा दावा होता. म्हणून कोर्ट रिसीव्हरनेंहि रेड्डींच्या अधिकाराचे रिसीव्हर ह्या नात्यानें हायकोर्टाकडे अर्ज करून कंपनीस शेअर्स देण्यास लावावें अशी मागणी केली.

#### निवाडा

"रेड्डींनीं सर पद्मपाद ह्यांचा एजंट गुप्ता ह्यास शेअर सर्टिफिकिटें व सही केलेले ट्रान्स्फर अर्ज दिले, तेव्हां रेड्डी हे सर पद्मपाद ह्यांचे 'कन्स्ट्रक्टिव्ह ट्रस्टी' झाले व त्या नात्यानें सर पद्मपाद ह्यांचेसाठी नवे शेअर्स घेण्यासाठी अर्ज करणें त्यांचें कर्तव्य होतें. नव्या शेअर्सच्या पोटीं कंपनीस ज्या रकमा भराव्या लागतील त्यांची पूर्ण तरतूद करण्यास सर पद्मपाद तयार होते. तेव्हां, "मला शेअर्स नकोत; सर पद्मपाद ह्यांना ते द्या" असें सांगणारा रिनान्सिएशन अर्ज सर पद्मपाद ह्यांचेकडे धाडण्यास रेड्डी तयार झाले तरी त्यांत कांहीं तथ्य नव्हतें; कारण तसे अर्ज नाकारण्याचा पूर्ण अधिकार डायरेक्टरांना होता.

"आणखी नव्या शेअर्सची मागणी करण्याचा रेड्डींना अधिकार होता. उरलेली वेळ होईपर्यंत (१० मार्च, १९४५) भागीदारांना अर्ज पाठविण्यास सवड देण्यास १०५ क ह्या कलमानें डायरेक्टर बांधलेले आहेत."

अशा रीतीनें मत व्यक्त करून, सर पद्मपाद व कोर्ट रिसीव्हर ह्या दोघांचेहि दावे हायकोर्टानें मंजूर केले.

---

## दि सेंट्रल म्युच्युअल लाइफ इन्शुअरन्स कं. लि., मुंबई

### खर्चाचें अल्प प्रमाण

गेल्या वर्षीच्या प्रतिकूल परिस्थितींतहि वरील कंपनीनें ६,३१,५०० रुपयांचें काम मिळविलें व ५,४१,५०० रुपयांचें काम पुरें केलें. कमी काम मिळालें तरी चालेल, पण तें किफायतशीरपणें मिळवावयाचें व व्यवस्था खर्च काटकसरीनें करावयाचा; हें चालकांचें प्रथमपासूनचें धोरण आहे. त्यामुळें कामाचा आकडा मोठा करण्यापेक्षा व्यवस्थेच्या खर्चाचें प्रमाण कमी करण्याकडे चालकांचें लक्ष असतें. १९४७ सालांतील कंपनीच्या व्यवस्था खर्चाचें प्रमाण फक्त १२·५% आहे. प्राथमिक खर्च कंपनीनें अगोदरच पूर्णपणें लिहून टाकलेला आहे. ह्या सर्व गोष्टींचा कंपनीच्या विमेदारांना—कंपनीचे तेच मालक आहेत—फायदा झाल्याविना रहाणार नाहीं. लाइफ फंड आतां सुमारें २ लक्ष रु. झाला आहे. पुणें येथें डेक्कन कॉलेज शेजारीं एका कॉलनीची योजना डायरेक्टर बोर्ड करीत आहे. कंपनीच्या पहिल्याच मूल्यमापनांत वाढावा दिसेल, असा डायरेक्टरांना विश्वास आहे. श्री. एस. एन. आगाशे हे कंपनीचे संस्थापक व मॅनेजिंग डायरेक्टर आहेत.

दि पूना मर्चंट्स कोऑपरेटिव्ह बँक, लि. चे मेंबर रजिस्टरवर ९०६ सभासद आहेत. वसूल भांडवलांत गेल्या वर्षी ८,६४० रु. ची भर पडली. ठेवींत २७,५८६ रु. ची वाढ आहे. एकूण थकबाकी ६९,९११ रु. आहे. तिचें कर्जरकमेशीं प्रमाण १२·४६% पडतें. अहवालाचे वर्षी बँकेस ७,५७६ रु. नफा झाला. ३½% डिव्हिडंडला ३,७०० रु. लागतील. (चेअरमनः श्री. ना. सं. जमदाडे; एजंटः श्री. भ. ग. साबणे.)

दि टीचर्स प्रॉ. इन्शुअरन्स सोसायटी लि., नागपूर, ह्या संस्थेनें ३१-१२-४७ अखेरच्या वर्षी १,०१,६०० रु. चीं २०९ नवीं विमापत्रकें दिलीं; मागील वर्षी ७५,४७५ रु. चीं १७५ विमापत्रकें तिनें दिलीं होतीं. "सोसायटीचे, तिच्या विमाव्यवसायाचे सुरवातीपासून (१९४१) मृत्यू क्लेम्स अपेक्षेपेक्षा अत्यंत अल्प आहेत." सोसायटीच्या रिन्युअल खर्चाचें प्रमाण ०% आहे. काम व लाइफ फंड वाढत आहे व खर्चाचें प्रमाण उतरत आहे (प्रेसिडेंटः राजे प्रतापसिंहराव भोसले; अवेतनीक चिटणीसः श्री. पुं. ना. चटपल्लीवार.)

भारत इं. बँक, लि.—ही बँक इतरहि कांहीं बँकांप्रमाणें, १९४६ च्या मुंबई सावकारी कायद्याच्या १८ ते २१ ह्या कलमांच्या अंमलबजावणींतून वगळण्यांत आली आहे. त्यामुळें त्या कायद्याची जिकीर बँकेस उरलेली नाहीं. ता. १० जूनच्या गॅझेटांत वरील हुकूम प्रसिद्ध झाला आहे.

---

**पांच महिन्यांत ७५ कोटी रुपये नफा**—कापडावरील नियंत्रण उठल्यापासूनच्या ५ महिन्यांत हिंदुस्थानमधील कापडाच्या गिरण्यांनीं ७५ कोटी रुपये नफा मिळवला असें म्हणतात. फायद्यापैकी बहुतेक नफा मुंबई प्रांतांतच मिळविण्यांत आला आहे. ७५ कोटी नफ्यापैकी अहमदाबादच्या गिरण्यांनीं १८ कोटींचा नफा मिळविला अशी बातमी आहे.

# सहकारी संस्थांच्या निवडणुकी

लेखकः–एक खिलाडू उमेदवार

लोकशाही संस्थेच्या कारभारांत निवडणुकीस प्राधान्य देण्यांत येतें. सहकारी संस्था ह्या सन्याखुऱ्या लोकमतानुवर्ती असल्यानें व त्यांच्या निवडणुकी सामान्यतः दरवर्षी होत असल्यानें ह्या निवडणुकी सामान्य जनतेमध्यें लोकप्रिय व खळबळीच्या अशा समजल्या जातात.

सहकारी संस्थेचा सभासद हा कोणीही गरजेकरितांच होतो व ती गरज म्हणजे आर्थिक नड भागविणें, जिवनोपयोगी वस्तू मिळविणें अगर वस्तीस जागा मिळविणें ह्याप्रमाणें असते. परंतु ही परिस्थिती प्रांतिक अगर जिल्हा संस्थांचे बाबत असूं शकत नाहीं. कारण, व्यक्तींची गरज प्रायः प्राथमिक संस्थेनें भागविण्याची असते. सहकारी संस्थेमध्यें व्यक्तीनें धारण करावयाची भागांची संख्या ही मर्यादित असते व एका व्यक्तीनें कितीही भाग धारण केले तरी त्यास फक्त एकाच मताचा अधिकार असतो ही गोष्ट ध्यानांत ठेवण्याची असते. शिवाय मतदान हें मुखत्यारामार्फत करावयाचें नसून व्यक्तीनें आपण होऊन स्वतः करावयाचें असतें. अमुक एक व्यक्ती भागांमध्यें भांडवल गुंतविते ती केवळ एका विशिष्ट उमेद्वारास मत देण्यासाठीं गुंतविते असा कोणी आक्षेप घेतल्यास तो असमंजसपणाचा आहे. भागाची रक्कम ही कांहीं लहान नसते. शिवाय आतां कित्येक सहकारी संस्थांच्या भागांची किंमत दर्शनी किंमतीच्या दीडपट तरी झाली आहे. तेव्हां कोणीही सद्गृहस्थ केवळ अकारण अशी रक्कम गुंतवील हें खरें नाहीं.

सहकारी संस्थांच्या निवडणुकीचे दृष्टीनें विचार करतां खालील प्रमाणें भाग पडतातः–(१) प्राथमिक संस्था—शेतकी व बिगर शेतकी, (२) जिल्हा संस्था, (३) प्रांतिक संस्था. ह्या सर्व संस्थांचेबाबत स्वतंत्र विचार करावा लागेल. प्रथम हें सांगितलें पाहिजे कीं उमेद्वार म्हणून निवडून येण्यास एकाहून कांहीं जास्त भाग धारण करण्याची आवश्यकता पुष्कळशा संस्थांत नाहीं. कांहीं संस्थांतूनच ती चालू आहे. फक्त उमेद्वार म्हणून उभी रहणारी व्यक्ती ही अनधिकृत अशी कोठल्याही सहकारी संस्थेची कर्जाची थक बाकीदार व्यक्ती असतां उपयोगी नाहीं, एवढाच एक दंडक आहे. कांहीं ठिकाणीं डायरेक्टरांच्या निवडणुकी या आळीपाळीनें होतात; म्हणजे सर्वच डायरेक्टर्सच्या निवडणुकी प्रतिवर्षी न होतां कांहीं ठराविक जागांचीच निवडणूक दरसाल करावयाची असते. निवडणुकी, शेतकी सोसायट्या सोडून, गुप्तमतदान पद्धतीनें होतात व निवडणुकीचा सर्व सोहळा ह्या सहकारी संस्थांच्या निवडणुकीस लागूं असतो. प्रांतिक अगर जिल्हा संस्थांच्या निवडणुकीसाठीं स्वतंत्र असे मतदार संघ असतात. प्रांतिक संस्थांत, सोसायट्या, नागरी पतपेढ्या, जिल्हा संस्था व व्यक्ती यांचे प्रतिनिधी मिळून संचालक मंडळ होतें व त्यासाठी भाषावार असे मतदार संघ असतात व मतदार संघ एक असून जागा राखीव असतात. परंतु यामुळें सर्वच मतदार संघाशीं दळण वळण बांधणें आवश्यक असतें आणि तें बांधणें कठीण होऊन बसतें. सर्व प्रांतांतील मतदार संस्थांकडे जाणेंही शक्य नसतें व परस्परांचा परिचय होणेंहि कठीण असतें व त्यांतच राजकीय, जातीय, व्यक्तिगत अशा अनेक अप्रिय प्रश्नांचा विचार होतो व निवडणुकींत हमखास यश येईल असें सांगणें कठीण होतें. यासाठी अशा संस्थांना पार्टीनें प्रतिनिधित्व यावें अशी योजना तयार करण्यांत आली होती.

जिल्हा सहकारी संस्थांचे बाबत निवडणूक मुख्यतः व्यक्तिशः मतदार संघांत चुरशीची होते. शेतकी सोसायट्यांचे प्रतिनिधी हे आपसांत समजूत करून बिनविरोध निवडून येण्याचा प्रयत्न करितात. असें बोलण्यांत येतें कीं कांहीं विशिष्ट निवडणुकींत मतदारांना लालूच दाखविण्यांत येते व हें खरें असेल तर त्यास वेळींच पायबंद घालणें जरूर आहे. या ठिकाणीं दुसऱ्या एका प्रश्नाचा विचार करावयास पाहिजे. वारंवार विचारल्या जाणाऱ्या, "कां हो, या सहकारी निवडणुकींत एवढी धांवपळ कां ? व लोक निवडणुकीस कशासाठी उभे राहतात ?" प्रश्नास उत्तर असें असावें कीं, सहकारी चळवळ ही लोकशाही चळवळीमधील अत्यंत साधी अशी चळवळ आहे. या चळवळींत भाग घेतल्यास समाजाच्या पुढें येण्यास व काम करण्यास वाव आहे. इतर कोठल्याही आर्थिक व्यवहाराच्या संस्थांच्या कारभारांत भाग घ्यावयाचा झाल्यास त्यामध्यें गुंतवावी लागणारी रक्कम मोठी असते व ती सहकारी चळवळींत भाग घेणाऱ्या मध्यमवर्गीय आर्थिक परिस्थितींतील व्यक्तीस शक्य नसते. म्हणून अगदीं साध्या साधनांनी समाजसेवा करण्याचें साधन म्हणून या निवडणुकीमध्यें चुरशीनें भाग घेतला जातो.

निवडणुकीमध्यें मतदानाचे निरनिराळे प्रकार आहेत. परंतु कोठेही प्रेफरेन्शिअल मतदानाची पद्धत नाहीं. अलीकडे सर्वांना पसंत होण्यासारखी म्हणजे जेवढ्या जागा तेवढीं मतें व तेंही एका व्यक्तीस जास्त नाहीं, अशा पद्धतीनें दिलीं जातात. निवडणुकीचें काम सोपें जावें म्हणून व संस्थेच्या धोरणांत एकसूत्रीपणा रहावा म्हणून उमेद्वार एकत्र येऊन मतप्रचार करतात यास कांहीं ठिकाणीं 'गट' या आक्षेपानें संबोधण्यांत येतें परंतु आक्षेप घेणारे याच मांडवाखालून गेलेले असतात, एवढेंच नव्हे, तर अशा प्रकारची व्यवस्था ते इतरत्र असल्यास करतातच व सहकारी चळवळींतही त्याचा पुरेपुर उपयोग करतात. निवडणुकीचे बाबतचा केव्हांही दुष्परिणाम संस्थेच्या कारभारावर आजवर झाला नाहीं. प्रत्येक उमेद्वारास 'मी' निवडून यावें असें वाटतें व त्यासाठी तो खटपट करतो व त्यानें निवडून येऊन कोणास धक्का दिल्यास त्याचे नांवानें अगर इतरांचे नांवानें अन्यायमूलक अशी टीका केली जाते. यश आल्यास कोणी आभार मानीत नाहीं; परंतु अपयश आल्यास खडे फोडण्यांत येतात अशी ही आभाररहित परिस्थिति आहे. आपले दोष किंवा दुर्गुण लपविण्यासाठी दुसऱ्यावर टीका केल्यास आपलें संरक्षण होईल असें समजलें जातें व तीच गोष्ट त्यांचे हातून इतर संस्थांचे बाबत नित्य चालू असते. ही गोष्ट खरी कीं, सहकारी संस्थांच्या निवडणुकीमुळें आणि त्यामध्यें काम केल्यास जितके मित्र मिळतात त्याप्रमाणेंच कांहीं अकारण असे मित्र गमावले पण जातात.

या सहकारी निवडणुकीमध्यें सुधारणा व्हावयाची म्हटल्यास पुढील बाबींचा विचार व्हावाः—

(१) संचालक मंडळामध्यें निवडून येणाऱ्यास कांहीं विशिष्ट भाग धारण करण्याची अपेक्षा असावी काय ?

(२) प्रांतिक सहकारी संस्थांच्या निवडणुकीचे मतदार संघ भाषावार स्वतंत्र असावेत काय ? संस्थांना ठराविक वर्षांनीं प्रतिनिधी पाठवितां यावा काय ?

(३) जिल्हा अगर प्रांतिक निवडणुकींत प्रेफरेन्शिअल मतदानाची योजना अंमलांत आणणें इष्ट आहे काय ?

(४) निवडणुका दर वर्षी सर्व डायरेक्टर्सच्या न करतां, आळीपाळीनें ठराविक डायरेक्टर्सची निवड व्हावी काय ?

(५) शेतकी सोसायट्या अगर संघ यांच्याही निवडणुका गुप्त मतदान पद्धतीनें करणें शक्य आहे काय ?

—x—

हिंदी पार्लमेंटांत

## आर्थिक प्रश्नांवर प्रकाश

दरवर्षी होणाऱ्या मृत्यूंच्या संख्येपेक्षा जननाच्या संख्येचें जें सरासरी अधिक प्रमाण पडतें, तें लक्षांत घेतलें तर १९४७ सालीं हिंदी संघराज्यांतील लोकसंख्या ३३ कोटी, १७ लाख असावी असा अंदाज आहे. १९४१ च्या खानेसुमारींतील स्त्री-पुरुषांचें प्रमाण गृहीत धरून वरील लोकसंख्येपैकीं दर १,००० पुरुषांशीं ९३५ स्त्रिया असें प्रमाण पडावें. म्हणजे १७ कोटी, १४ लाख पुरुष आणि १६ कोटी, ३ लाख स्त्रिया हिंदमध्यें असाव्यात असा अंदाज आहे. १९४८ मध्यें ही लोकसंख्या ३३ कोटी, ७० लाख होईल.

× × ×

युद्ध सुरू होण्यापूर्वी हिंदुस्थान सरकारचा चांदीचा सांठा १८ कोटी, ५० लाख औंस होता. त्यापैकीं कांहीं लंडन येथें व कांहीं हिंदुस्थानांत होता. युद्धकाळांत हिंदुस्थानांतून लंडनला प्रत्यक्ष वहातूक करून नेलेली चांदी ६ कोटी, ३० लाख औंस होती. ही पाठविलेली चांदी इंग्लंडमध्यें विक्रीला काढली गेली हें खरें आहे. इंग्लंडच्या सरकारला हिंदुस्थाननें एकूण १५ कोटी, २० लाख औंस चांदी आंतरराष्ट्रीय भावाप्रमाणें विकली. हा भाव दर औंसाला १७३⁄४ ते २३१⁄४ पेन्स असा खालीं-वर होत असे. विक्रीची एकूण किंमत २१ कोटी, ४० लाख रुपये म्हणजे १ कोटी, ६१ लाख पौंड आली. १९४१–४२ ह्या फडणिशी वर्षांत अनुक्रमें ३ कोटी, ४८ लाख औंस आणि २५ लाख औंस चांदी विकण्यांत आली. त्यावेळीं भाव दर औंसामागें २२ ते २३१⁄२ पेन्स असा होता. ही चांदी इंग्लंडला कायमचीच विकण्यांत आली असल्यानें ती परत घेण्याचा प्रश्नच उत्पन्न होत नाहीं. ह्या व्यवहारांत हिंदुस्थानचें ५१⁄२ कोटी रुपयांचें नुकसान झालें.

× × ×

सांताक्रूझ येथील विमान तळाच्या सुधारणेवर येत्या दोन वर्षांत २ कोटी, ६५ लक्ष रुपये खर्चिले जाणार आहेत. डमडम विमानतळाच्या सुधारणेस १ कोटी, ८३ लक्ष रुपये व पालम विमान तळाच्या सुधारणेस ६२ लक्ष रुपये लागतील.

× × ×

रिझर्व्ह बँकेच्या राष्ट्रीयीकरणाचें बिल हिंदी पार्लमेंटांत मांडण्यांत आलें आहे. त्याप्रमाणें प्रत्येक १०० रु. च्या भागास ११८ रु. १० आ. ३% सरकारी रोख्यांच्या स्वरूपांत देण्यांत येतील. ह्या रोख्यांची परतफेड सरकार मर्जीप्रमाणें केव्हांहि करूं शकेल.

× × ×

हिंदुस्थानाचें स्टर्लिंगमधील येणें हें रिझर्व्ह बँकेच्या मालकीचें असून, त्याच्या गुंतवणुकीबाबत अधिकार बँकेचा आहे. ह्या गुंतवणुकीवर किती व्याज सुटलें, त्याचा तपशील देण्याचा प्रघात नाहीं. कांहीं रकम दीर्घ मुदतीच्या तर कांहीं अल्प मुदतीच्या ब्रिटिश रोख्यांत असून कांहीं ब्रिटिश ट्रेझरी बिलांत आहे. त्या सर्वांवर मिळून सरासरीनें ०·७५ ते ०·८% व्याज सुटतें.

× × ×

म. गांधी राष्ट्रीय स्मारक निधीस ज्या लिमिटेड कंपन्यांना देणगी द्यावयाची असेल, त्यांना कंपनी कायद्याची, स्वतःच्या मेमोरँडमची किंवा आर्टिकल्स ऑफ असोसिएशनची आडकाठी येऊं नये ह्यासाठीं हिंदी पार्लमेंटानें एक बिल मंजूर केलें आहे. स्पेशल ठराव करून कोणतीहि कंपनी ह्या फंडास आपल्या शिंदगींतून देणगी देऊं शकेल.

## धी लोकमान्य मिल्स बार्शी लिमिटेड

### ता. ११ जुलै १९४८ रोजीं भरलेल्या २६ व्या सर्वसाधारण सभेचा त्रोटक वृत्तांत

—×—

श्री. रा. रा. श्रीधर वामन नाईक यांनीं अध्यक्षस्थान स्वीकारलें. सुरवातीस मागील ऑर्डिनरी सभेचें प्रोसीडिंग वाचून दाखविण्यांत आलें व तें कायम करण्यांत आलें. नंतर, सन १९४७ वर्षअखेरचा कंपनीचे ऑडिटर्सनीं तपासलेला आढावा व नफातोटापत्रक व डायरेक्टर्स यांचा रिपोर्ट वाचून दाखविल्यावर तो सर्वानुमतें मंजूर करण्यांत आला.

### नफा व डिव्हिडंड

अहवालाचे सालीं कंपनीस एकूण नफा रु. ३०,६५९–१४–९ झाला. यांत मागील सालचा शिल्लक नफा रु. १७२–११–३ मिळविला म्हणजे एकूण नफा रु. ३०,८३२–१०–३ होत आहे. यापैकीं रु. १०,००० घसारा फंडाकडे नेणें व शिल्लक राहिलेले रु. २०,८३२–१०–३ यांत डिव्हिडंड इक्वलायझेशन फंडांतून रु. २५,०१० घेऊन त्यांतून ८ वें डिव्हिडंड प्रत्येक शेअरमागें ४ टक्के प्रमाणें (इन्कमटॅक्स वजा न घेतां) देणेसाठीं रु. ४५,०१० काढून शिल्लक नफा रु. ८३२–१०–३ पुढील सालावर नेणें व भागीदारांना डिव्हिडंड तारीख ११-९-१९४८ पासून देणेस सुरवात करावी असें ठरलें.

कंपनीच्या नियमाप्रमाणें श्री. रा. व्ही. डी. शिराळकर, श्री. रा. आर. एम्. वखारिया व श्री. रा. व्ही. बी. दिवटे हे डायरेक्टर्स पाळीप्रमाणें रिटायर झाले होते. त्यांचीच पुढील वर्षाकरितां फेरनिवडणूक करण्यांत आली. त्याचप्रमाणें, मेसर्स खरे आणि कंपनी, मुंबई यांची सन १९४८ सालासाठीं ऑडिटर म्हणून निवडणूक होऊन त्यांचा मेहनताना रु. ६५० अधिक प्रवास खर्च रु. १००, ह्या प्रमाणें ठरविण्यांत आला.

### अध्यक्ष व मॅनेजिंग एजंट ह्यांचीं भाषणें

यानंतर अध्यक्षांचें थोडक्यांत समारोपाचें भाषण झालें. त्यांत मागील वर्षीं गिरणी तीन पाळ्यानें चालविली; परंतु त्यांत सामानाची मोडतोड फार होऊन खर्च अधिक लागतो असें दिसल्यावरून एप्रिल, १९४८ पासून तीन पाळ्या बंद करून प्रत्येकीं ८ तासाच्या दोन पाळ्या या प्रमाणें काम सुरू केलें. मजुरांचे स्टँडर्डायझेशन-प्रमाणें पगार वाढवून ठरविण्याचें काम इंडस्ट्रिअल कोर्टापुढें चालू आहे, व महागाईतही वाढ होण्याचा संभव आहे. परंतु सूत वांटप पद्धति सरकारमार्फत होती ती बंद झाली असून भाव नियंत्रण रद्द झालें आहे. सबब कमी झालेलें नफ्याचें प्रमाण पुढील सालीं वाढेल अशी उमेद आहे, असें त्यांनीं सांगितलें. त्या नंतर मॅनेजिंग एजन्ट रा. भ. पं. सुलाखे यांनींहि नवीन स्पिनिंग मशिनरी लवकरच येणार असून त्या योगानें उत्पादन वाढणार आहे; व त्यास खर्चही बराच येणार आहे. सबब नवीन शेअर घेणेची आवश्यकता सांगितली व ज्यांनीं शेअरबाबत अद्याप मागणी केली नाहीं त्यांनीं ती त्वरित करावी, अशी विनंति केली व जमलेल्या सभासदांचे व अध्यक्षांचे आभारप्रदर्शनानंतर सभेचें काम संपलें.

इं. फि. कॉर्पोरेशनचे शेअर्स—इंडस्ट्रिअल फिनॅन्स कॉर्पोरेशनच्या शेअर्सचें मुद्दल व त्यावरील किमान व्याज ह्यांची हिंदुस्थान सरकारनें हमी घेतली असल्याकारणानें, विमा कंपन्यांनीं ते घेण्यास हरकत नाहीं. विमा कायद्याखालील "अॅप्रूव्हड् सिक्युरिटीज"च्या व्याख्येंत ते शेअर्स बसतात.

स्वातंत्र्याच्या पहिल्या वर्षाचा

## धावता आर्थिक आढावा

### अनुभव जमेस धरून दोष काढून टाका

( प्रा. स. वा. कोगेकर. )

१५ ऑगस्ट १९४८ रोजीं हिंदी स्वातंत्र्याचें पहिलें वर्ष पूर्ण झालें. या वर्षातील आर्थिक घडामोडींकडे नजर टाकल्यास स्वातंत्र्याचा उपयोग आर्थिक क्षेत्रांत तरी जनतेच्या हिताला पोषक असें धोरण आखण्यांत झाला, असें म्हणतां येणार नाहीं. वाढत्या किमतीमुळें बहुसंख्य जनतेच्या मिळकतींत सारखी घट येऊन रहाणीचें मान खालावूं लागलें. या परिस्थितींतून मार्ग काढण्याची सरकारपुढें मुख्यतः तीन साधनें होतीं.

#### चलनवृद्धि

पहिलें साधन म्हणजे चलनवृद्धि थांबविण्याचें. भरमसाट चलनवाढ झाल्यामुळें किमतींच्या वाढीला जोरानें चालना मिळाली ही गोष्ट सर्वमान्य झालेली आहे. तरीसुद्धां सरकारनें चलनवाढीला आळा घातला नाहीं. जवळ जवळ ९६ कोटी रुपयांचें नवें चलन गेल्या वर्षांत प्रसृत करण्यांत आलें. निर्वासितांची सोय, काश्मीरमधील युद्ध, अन्नधान्याची आयात यापायीं सरकारला जादा खर्च करावा लागला ही गोष्ट खरी असली तरी त्यासाठी चलनवाढीचा आश्रय केल्यामुळें या खर्चाचा बोजा अत्यंत अन्याय्य पद्धतीनें सामान्य जनतेवर लादण्यांत आला.

#### नियंत्रण

दुसरें साधन नियंत्रणाचें. परंतु या बाबतींत तज्ज्ञांचा सर्व सल्ला धुडकावून लावून सरकारनें विनियंत्रण करण्याचें ठरविलें. अन्नधान्य व कापड यांच्या किंमतीवरील व वांटपावरील नियंत्रण ( कांहीं शहरें सोडून ) काढून टाकल्यामुळें किंमती वाढण्यास उत्तेजनच मिळालें. मालाचें उत्पादन मात्र वाढलें नाहीं. त्यामुळें मूठभर उद्योगपति आणि व्यापारी यांनीं भरमसाट नफे मिळविले. एकट्या कापडाच्या धंद्यांत विनियंत्रणानंतरच्या सहा महिन्यांत ७५ कोटी रुपयांहून अधिक फायदा झाला असा सरकारतर्फेच अंदाज करण्यांत आला आहे !

#### कर व कर्जें

तिसरें साधन कर व कर्जें यांच्या योगानें जनतेच्या हातांतील जादा चलन काढून घेऊन किंमतींना आळा घालणें हें होय. पण सुरवातीस सांगितल्याप्रमाणें त्याऐवजीं चलनवाढीचाच आश्रय करण्यांत आला. वास्तविक पहातां भरमसाट वाढलेल्या किंमती अधिक वाढूं नयेत म्हणून सरकारनें आपलें अंदाजपत्रक शिलकीचें करण्याची खटपट करावयास पाहिजे. पण आमच्या सरकारनें त्याऐवजीं तुटीच्या अंदाजपत्रकांचा अवलंब केला. उद्योगधंदेवाल्यांना उत्तेजन देण्याच्या हेतूनें त्यांच्यावर असलेले करही कमी केले, मग त्यांत वाढ करण्याची गोष्ट तर दूरच. उलट आपल्या जुन्या शिलकी रकमा निकालांत काढून सरकारनें जनतेच्या हातांतील खेळता पैसा वाढविला.

#### औद्योगिक आघाडी

चलन व अंदाजपत्रक यांच्या द्वारां काढावयाचा मार्ग याप्रमाणें बंद झाला. पण प्रत्यक्ष औद्योगिक क्षेत्रांत पाय ठेऊन उत्पादनवाढीच्या योजना हातीं घेण्याच्या कामींहि फारसें पुढें पाऊल पडलें नाहीं. सरकारनें याबाबतींत मुख्यतः खासगी भांडवलदारांवर विसंबून रहाण्याचें ठरविलें. पण त्यांत सुद्धां आपलें नक्की धोरण काय आहे तें निश्चितपणें न सांगतां आल्यानें प्रत्यक्ष परिस्थितींत सुधारणा झाली नाहीं. १० वर्षेपर्यंत आज खासगी मालकीखालीं असणाऱ्या उद्योगधंद्यांस सरकार हात लावणार नाहीं असें सरकारतर्फे जाहीर झालें असलें तरी काँग्रेसतर्फे नेमण्यांत आलेल्या व पं. नेहरूंच्या अध्यक्षतेखालीं काम करणाऱ्या एका आर्थिक समितीनें ही मुदत ५ वर्षांवर आणण्याची शिफारस केल्यामुळें भांडवलदार वर्गांत साशंकतेचें वातावरण निर्माण झालें आहे. सरकारनें करयोजनेंत त्यांना सहानुभूतीचें धोरण आखलें असलें व १० वर्षांसंबंधीचें आश्वासन अनेक वेळीं दिलें असलें तरी तेवढ्यावर विसंबून आपल्या उत्पादनयोजना पुढें सुरू ठेवण्यास भांडवलदार तयार नाहींत असें दिसूं लागलें आहे. पण उलट सरकारजवळही अन्य कोणतीच योजना नसल्यामुळें औद्योगिक आघाडीवर कुचंबणा सुरू आहे. त्यांतच मालक-मजूर वादानें भर टाकली आहे. या दोन पक्षांत समेट घडवून आणावा म्हणून एक औद्योगिक परिषद् बोलविण्यांत येऊन तिनें समेट-योजनेस कांहीं अटींवर मान्यताही दिली. परंतु मजुरी आणि किंमती यांची शर्यत सारखी चालूं राहिल्यामुळें समेटाचा ठराव कागदोपत्रींच राहिला. आतां नफ्याचा वांटा मालकांबरोबरच कामगारांनाही देण्यांत येऊन या दोन पक्षांचें सहकार्य स्थापन करण्याचे प्रयत्न सुरू आहेत. परंतु प्रत्येक धंद्याची स्थिति वेगवेगळी असल्यामुळें या प्रकारें सहकार्याचा कितपत लाभ होईल हा प्रश्नच आहे.

#### यंत्रसामुग्री

उत्पादनांत वाढ होण्यासाठी आणखी एक जरूरीची गोष्ट म्हणजे यंत्रसामुग्री. युद्धकालांत यंत्रसामुग्रीची झीज बऱ्याच प्रमाणावर झाली पण नवीं यंत्रें परदेशांतून न आणतां आल्यामुळें ह्या झिजेचा परिणाम आपली उत्पादनशक्ति आणखीच कमी होण्यांत झाला. त्यावर उपाय म्हणजे नवीं यंत्रें आणून अस्तित्वांत असलेले उद्योगधंदे अधिक कार्यक्षम करणें व नवे उद्योगधंदे उभारणें. पण या दोन्ही गोष्टी यंत्रसामुग्रीच्या दुर्मिळतेमुळें शक्य झाल्या नाहींत. या कामीं लागणारे डॉलर–चलन आपणाजवळ पुरेसे नव्हते व स्टर्लिंग शिलकांचा उपयोग डॉलरमध्यें रूपांतर करण्यास होत नव्हता. या परिस्थितींत आहे त्या उत्पादक शक्तीचा शक्य तितका उपयोग करून अधिकांत अधिक उत्पादन काढण्यासाठीं सरकारी नियंत्रणाची अत्यंत आवश्यकता होती. परंतु विनियंत्रणाच्या धोरणामुळें तें शक्य झालें नाहीं.

#### स्टर्लिंग शिलका

स्टर्लिंग शिलकांबाबत गेल्या वर्षांत एकंदर तीन करार झाले. त्या सर्वांचा परिणाम म्हणून आपल्याला गेल्या वर्षांत एकंदर ८ कोटी, ३० लक्ष पौंड इतकी पौंडी ठेव वापरावयास मिळाली होती. पण त्यापैकीं ८ कोटी अजून तसेच शिल्लक आहेत. यापुढील तीन वर्षांत आणखी ८ कोटी पौंडांची त्यांत भर पडणार असली तरी ही रक्कम डॉलरमध्यें रूपांतरित करण्यावर कडक निर्बंध लादलेला असल्यामुळें व आपणास हवी ती यंत्रसामुग्री ब्रिटनमध्यें मिळणें दुरापास्त असल्यामुळें, प्रत्यक्ष देशांतील आर्थिक स्थिति सुधारण्यास तिचा कितपत उपयोग होईल, शंकाच आहे.

#### तातडीच्या प्रभावी योजनेची आवश्यकता

वरील सर्व विवेचनावरून आपल्या आर्थिक स्थितींत गेल्या वर्षांत कसा अनिष्ट फरक पडला त्याची अंधुकशी तरी कल्पना येईल.

या स्थितीकडे यापुढें नुसते पहात राहून चालणार नाहीं, ती सुधारण्यासाठी कांहींतरी तातडीची व प्रभावी उपाययोजना केली पाहिजे अशी जाणीव सरकारलाही होऊं लागली आहे, ही त्यांतल्या त्यांत समाधानाची गोष्ट आहे.

एक नवा मंत्रि नेमला कीं लगेच हा प्रश्न सुटेल असें मानण्याचें कारण नाहीं. ज्या धडाडीनें आणि विशेषतः निर्भीडपणानें या मंत्र्याचें काम चालेल त्यावरच त्याच्या खात्याचें यशापयश अवलंबून राहील. पहिल्या वर्षाचा अनुभव जमेला धरून त्यांतील दोष काढून टाकण्याचा जर मनापासून प्रयत्न झाला तर अजूनही परिस्थिति सुधारतां येईल, निदान जास्त बिकट तरी होऊं न देण्याची व्यवस्था करतां येईल यांत शंका नाहीं. या देशाचें तेवढें भाग्य असेल काय ?

## दि डेक्कन पॉटरीज ॲण्ड अलाइड इंडस्ट्रीज, लि.

रजिस्टर्ड ऑफिसः—१९६।२९, सदाशिव पेठ, पुणें २

कारखानाः—चिंचवड ( जी. आय्. पी. रेल्वे ) पुणें शहरानजीक. तारेचा पत्ताः—"पॉटर्स", पूना.

**चेअरमन—रावबहादुर गणेश गोपाळ शेंबेकर, जमीनदार, बारामती.**

★ कंपनी कपबशा, बरण्या, फायर ब्रिक्स, कौलें वगैरे नित्योपयोगी माल तयार करण्याकरितां स्थापन झाली आहे.


★ कंपनीच्या जागेंत कारखान्याची इमारत, भट्टी, चिमणी व गोडाऊन बांधून पुरें झालें आहे.

★ कच्चा माल कारखान्यांत आलेला असून मशिनरी बसविण्याचें काम सुरू आहे.

**मेसर्स नॅशनल ट्रेडिंग कंपनी, पुणें २.**

मॅनेजिंग एजन्टस्.

शेअर्स वगैरे माहितीकरितां कंपनीच्या रजिस्टर्ड ऑफिसशीं पत्रव्यवहार करावा.



## अधिक धान्य पिकविण्याची योजना

—यशस्वी होण्यास—

# किर्लोस्कर पंपिंग सेट्स

हें अमोघ साधन आहे.

त्याचें सहाय घ्या !

किर्लोस्कर बंधु, लिमिटेड . . . . किर्लोस्करवाडी

नवीन पुष्कळ निघाले, तरी

# तुळजाराम मोदी, सातारा

ह्यांचें पुढारीपण कायम आहे.

## दि व्हल्कन इन्शुअरन्स कं. लि.

—पुणें शाखा—

१७९, कर्वे बिल्डिंग, लक्ष्मी रोड.

**आग, मोटार, अपघात व वर्कमेन्स कॉंपिन्सेशन ह्यांचे विमे स्वीकारणारी प्रमुख स्वदेशी कंपनी.**

एजन्सी व इतर माहितीसाठी चौकशी करा :

ब्रँच सेक्रेटरी.

## दि मोटार ओनर्स म्युच्युअल इन्शुअरन्स कं. लि. (बेळगांव)

**पुणें शाखाः—९७४ सदाशिव, लक्ष्मी रोड.**

मोटार मालकांनींच स्थापन केलेली, मोटारीचा विमा उतरणारी, मोटार मालकांचेंच संचालक मंडळ असलेली व विमेदारांना हक्कानें शेअर्स देण्याची योजना आखणारी अखिल भारतांतील पहिलीच संस्था. प्रीमियमचे दर अत्यंत माफक व शिवाय अनेक सवलती. —एजन्सी व इतर माहितीकरितां चौकशी करा.— ब्रँच सेक्रेटरी








हें पत्र पुणें, पेठ भांबुर्डा घ. नं. ९१५।१ आर्यभूषण छापखान्यांत रा. विठ्ठल हरि बर्वे यांनीं छापिलें व
प्र. रा. श्रीपाद वामन काळे, बी. ए. यांनीं 'दुर्गाधिवास,' ८२३ शिवाजिनगर (पो. ऑ. डेक्कन जिमखाना) पुणें ४ येथें प्रसिद्ध केलें.